# Lokmat

23/01/2020

लोकमत

# मार्लेश्वर यात्रेनिमित्त भाविकांसाठी उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरुख : प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या फार्मसी कॉलेज, साडवली महाविद्यालयाने मार्लेश्वर यात्रेनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत विविध उपक्रम आयोजित केले होते. महाविद्यालय आणि ग्रामीण रुग्णालय, देवरुख यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात रक्तगट, रक्तशर्करा, हिमोग्लोबीन आणि एड्स याविषयींची तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचा सुमारे ४५० भाविकांनी लाभ घेतला.

'मुलगी वाचवा आणि डोन्ट ड्रिंक अँड ड्राईव्ह' या विषयांवर आधारित



देवरुखनजिकच्या साडवली येथील फार्मसी कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थ्यांनी मार्लेश्वर यात्रेनिमित आयोजित विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

पथनाट्यद्वारे स्वयंसेवकांनी जनजागृती केली. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष रवींद्र माने, प्राचार्य डॉ. बि. सि. हातपकी यांनी कौतुक केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. संसारे, ग्रामीण रुग्णालयाच्या विद्या माने आणि वैशाली पुजारे तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक यांनी मेहनत घेतली.

Prahar

01/10/2019

## साडवली येथील ४ प्राथमिक शाळांमध्ये साहित्य वाटप

देवरूख (प्रतिनिधी): नजीकच्या साडवली येथील फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनाचे औचित्य साधून साडवली येथील ४ प्राथमिक शाळांमध्ये साहित्य वाटप करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाचे सर्व शाळांनी कौतुक केले. सदर उपक्रमात १३० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न राष्ट्रीय सेवा योजना विभाग करतो ही अभिमानाची बाब आहे असे प्रतिपादन यावेळी प्रा. व्ही. ए. संसारे यांनी केले. यावेळी चारही प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक,विद्यार्थी उपस्थित होते.

## साडवली येथील फार्मसी महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम

देवरूख (प्रतिनिधी): नजीकच्या साडवली येथील फार्मसी महाविद्यालयात नुकताच मतदार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. तहसील कार्यालय देवरूख व फार्मसी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यामार्फत हा कार्यक्रम फार्मसी महाविद्यालयात घेण्यात आला. यावेळी तलाठी अमर चाळके, योगेश कदम यांनी इव्हीएम व व्हीव्हीपॅड यंत्रणेची सर्वकष माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिल्याने विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन होवून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी ६० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रा. से. यो. चे प्रा. व्ही. ए. संसारे यांनी मानले.

# LOKMAT

## 23/08/2019

लोकमत

# इंदिरा फार्मसीचा वर्धापनदिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरुख : साडवली येथील प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या इंदिरा फार्मसी महाविद्यालयाचा ११वा वर्धापनदिन व रवींद्र माने यांच्या ६१व्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व भक्तश्रेष्ठ श्री वालावलकर रुग्णालय, डेरवण आणि आय. सी. टी. सी. विभाग, ग्रामीण रुग्णालय, देवरुख यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ ऑगस्ट रोजी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



देवरुखच्या साडवली येथील इंदिरा फार्मसी महाविद्यालयाच्या वर्धापन दिन कार्यक्रमाचा प्रारंभ नेहा माने यांनी केला.

या उपक्रमांमध्ये श्री स्वामी समर्थ रक्तपेढी, डेरवण यांच्यामार्फत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. विद्यार्थी, कर्मचारी, Adlar Mediequipments चे कर्मचारी व इतर ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. या शिबिरात ३५ जणांनी रक्तदान करुन सामाजिक हित साधले. ग्रामीण रुग्णालयाच्या अंतर्गत एकूण ७० चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले. यामार्फत शालेय विद्यार्थ्यांचे एड्स व इतर संसर्गजन्य रोगांबद्दल समुपदेशन करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयामार्फत एकूण १७० विद्यार्थ्यांचे एच. आई. व्ही. तपासणी शिबिर घेण्यात आले.

संस्थेच्या कार्याध्यक्षा नेहा माने यांच्याहस्ते यावेळी विविध उपक्रमांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी दिलीप जाधव, चंद्रकांत यादव, जयश्री दळवी प्राचार्य डॉ. बी. सी. हातपक्की, आय. सी. टी. सी. विभागाच्या वैशाली पुजारी, विद्या माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे विपुल संसारे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

# PRAHAR

21/08/2019

## ▶इंदिरा फार्मसी महाविद्यालयाचा ११ वा वर्धापन दिन उत्साहात

**देवरूख (प्रतिनिधी):** साडवली येथील प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेच्या इंदिरा फार्मसी महाविद्यालयाचा ११ वा वर्धापन दिन व माजी राज्यमंत्री रवींद्र माने यांच्या ६१ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व भक्तश्रेष्ठ श्री वालावलकर रूग्णालय, डेरवण आणि आय.सी.टी.सी. विभाग ग्रामीण रूग्णालय देवरूख यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या उपक्रमामध्ये श्री स्वामी समर्थ रक्तपेढी, डेरवण यांच्या मार्फत रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला विद्यार्थी, कर्मचारी, अ‍ॅडलर कंपनीचे कर्मचारी व इतर ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरामध्ये ३५ जणांनी रक्तदान करून सामाजिक हित साधले. ग्रामीण रूग्णालयाच्या अंतर्गत एकूण ७० चित्रांचे संसर्गजन्य रोगांबद्दल समुपदेशन करण्यात आले. ग्रामीण रूग्णालयामार्फत एकूण १७० विद्यार्थ्यांचे एच.आय.व्ही. तपासणी शिबीर घेण्यात आले. या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्था कार्याध्यक्षा नेहा माने, दिलीप जाधव, चंद्रकांत यादव, जयश्री दळवी, डॉ. बी. सी. हातपक्की, आय.सी.टी.सी. विभागाच्या वैशाली पुजारी, विद्या माने, राष्ट्रीय सेवा योजनेचे विपुल संसारे व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

सकाळ | रत्नागिरी
रत्नागिरी, बुधवार, २३ जानेवारी २०१९
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800



देवरुख : मार्लेश्वरात फार्मसी महाविद्यालय साडवली व देवरुख ग्रामीण रुग्णालय यांनी संयुक्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर राबविले.

# मार्लेश्वरात आरोग्य तपासणी

**देवरूख :** प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्था संचालित साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालय व देवरुख ग्रामीण रुणालयाच्या संयुक्त विद्यमाने मार्लेश्वर तीर्थक्षेत्री मोफत आरोग्य तपासणी शिबिर पार पडले. राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत हे शिबिर घेण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यकारी अधिकारी व्ही. ए. संसारे, जे,व्ही. नरोटे, एस. एस, कराळे, एस. आय. मेडली, एनएसएस स्वयंसेवकांनी व ग्रामीण रुणालयातील एनसीडी, आयसीटीही, विभाग यांनी आलेल्या ४०० हून अधिक भाविकांचे व उपस्थित महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे कर्मचारी व पोलिसांचे रक्तदाब व रक्तातील साखरेचे प्रमाण, एचआयव्ही बद्दल माहिती, हिमोग्लोबीन रक्तगट इत्यादी तपासण्या विनामूल्य करण्यात आल्या. यावेळी देवरुख ग्रामीण रुणालयाचे डॉ. संदीप माने यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

रत्नागिरी

मंगळवार । ८ जानेवारी २०१९ । वर्ष ८१ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधु

# साडवलीतील फार्मासी विद्यालयाचे शिबिर

**देवरूख : विशेष प्रतिनिधी**

नजीकच्या साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मासी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे निवासी शिबिर उत्साहात पार पडले. हे शिबिर साडवली जाधववाडी येथे घेण्यात आले.

या शिबिरात साडवली गावाच्या ग्रामदेवतेचे मंदिर, विठ्ठल मंदिर स्वच्छ करणे, गावातील नैदरवाडी येथे दोन बंधारे बांधणे, देवरूख येथील वृध्दाश्रमाला भेट आदी उपक्रम राबवण्यात आले. याचप्रमाणे साडवली गावातील रस्ते स्वच्छ केले.

शिबिराच्या प्रत्येक दिवसाची सुरूवात पहाटे योगा, प्राणायाम व व्यायाम तसेच प्रार्थनेने करण्यात आली. बौध्दिक व्याख्यान कार्यक्रमात ग्रामविकास या विषयावर स्वप्नील सावंत, खाद्यपदार्थांमधील भेसळ या विषयावर डॉ. सागर सकपाळ, अहिंसा विषयावर भगवतसिंग चुंडावत, शासकीय योजना विषयावर धनंजय साठे, आपत्कालीन व्यवस्थापन-युयुत्सु आर्ते, स्त्री सक्षमीकरण-वैदेही सावंत, भारताचा गौरवशाली इतिहास-वैभव संसारे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी गावकऱ्यांना अवयव दान, व्यसनाचे दुष्परिणाम या विषयांवर नेहा पाटणकर, प्रज्ज्वल शेंडगे यांनी मार्गदर्शन केले. 'मुलगी वाचवा, दारू सोडा, कापडी पिशव्यांचा वापर' याबाबत पथनाट्यातून जनजागृती केली. याचप्राणे पातेरेवाडी येथे पारंपरिक लोकगीतांची माहिती करून घेतली.

शिबिराची सांगता सरपंच साक्षी नाखरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली. यावेळी राजू जाधव, भाई जाधव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. सी. हतपक्की उपस्थित होते. शिबिर यशस्वीतेसाठी प्राध्यापक, 'रासेयो'चे स्वयंसेवक यांनी मेहनत घेतली.

सकाळ | रत्नागिरी
रत्नागिरी, मंगळवार, ८ जानेवारी २०१९
TODAY
SakalNews | @esakalupdate | www.esakal.com
Call Center : 9225800800



देवरूख : एनएसएस शिबिरातंर्गत साडवली येथे बंधारा बांधताना फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# साडवलीत विद्यार्थ्यांनी बांधले दोन बंधारे

**देवरूख :** साडवलीतील इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागातंर्गत साडवलीतील निवासी शिबिरात गावात श्रमदानातून दोन बंधारे बांधले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी देवरूखमधील श्रेयस वृद्धाश्रमाला भेट देत ज्येष्ठ नागरिकांची सेवा केली. स्वच्छतेचे महत्त्व पटवून देताना साडवलीतील विठ्ठल मंदिर, ग्रामदेवता मंदिर परिसर आणि रस्ते साफ करण्यात आले. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांना स्वप्नील सावंत यांनी ग्रामविकास, डॉ. सागर सकपाळ यांनी खाद्यपदार्थ भेसळ, भगवतसिंग चुंडावत यांनी अहिंसा, धनंजय साठे यांनी शासकीय योजना, युयुत्सु आर्ते यांनी आपत्कालीन व्यवस्थापन, वैदेही सावंत यांनी स्त्री सक्षमीकरण, वैभव संसारे यांनी भारताचा गौरवशाली इतिहास या विषयांवर मार्गदर्शन केले. मानवी अवयवदान संदर्भात स्वयंसेविकास नेहा पाटणकर आणि प्रज्वली शेंडगे यांनी व्यसनाच्या दुष्परीणामावर ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. प्लॅस्टिकच्या दुष्परिणामांची माहिती देत गावात कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. पारंपरिक संस्कृती जपण्याच्या उद्देशाने पातेरवाडीत जाऊन महिलांकडून ५० लोकगीतांची माहिती करून घेण्यात आली. समारोपाला सरपंच सौ. नाखरेकर, राजू जाधव, भाई जाधव, प्राचार्य हतपक्की उपस्थित होते.

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
रत्नागिरी
सोमवार । दि. ३ डिसेंबर २०१८ ।






देवरूख : येथे काढण्यात आलेली एड्स जनजागृती रॅली. या रॅलीत विद्यार्थ्यांसह प्रशासकीय अधिकारी व विविध संस्थांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. (छाया : शेखर जोगळे, देवरूख)

# देवरूखमध्ये एड्सबाबत जनजागृती रॅली

**देवरूख : प्रतिनिधी**

जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृतीसाठी देवरूख ग्रामीण रुग्णालय, आयटीसीटी विभाग व देवरूख लायन्स क्लबतर्फे देवरूख शहरात रॅली काढण्यात आली. मोहिमेच्या प्रारंभप्रसंगी संगमेश्वरचे तहसीलदार संदीप कदम, पोलिस निरीक्षक शिवाजी पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप माने, लायन्स क्लब अध्यक्ष नितीन शेडगे, सामाजिक कार्यकर्ते युयुत्सु आर्ते आदी उपस्थित होते.

या उपक्रमात जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक पथक रत्नागिरी, ऐच्छिक सल्ला केंद्र व तपासणी केंद्र देवरूख, रामराजे महाविद्यालय, आठल्ये सप्रे पित्रे महाविद्यालय, इंदिरा फार्मसी महाविद्यालय, मिनाताई ठाकरे विद्यालय, जेसीआय ग्रुप देवरूख, जायंटस् ग्रुप देवरूख व ताम्हाने, भारती राजवाडे यांची स्नेहबंध संघटना, त्यांचे पदाधिकारी व विद्यार्थी या रॅलीत सहभागी झाले होते.

डीकॅडचे प्राचार्य रणजित मराठे यांनी तयार केलेला एड्स जनजागृती लोगोचे प्रकाशन झाले. देवरूख महाविद्यालयाच्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांनी सुरज जाधव लिखित पथनाट्यातून एड्सबाबत जनजागृती केली. या रॅलीचे नियोजन डॉ. राहुल डोंगरे, डॉ.गौरव धामणे यांनी केले. शहरातून रॅली काढण्यात आली. चौकाचौकात पथनाट्य सादर करण्यात आले.

सकाळ रत्नागिरी, मंगळवार, ४ डिसेंबर २०१८

Today



देवरूख : एड्स दिनानिमित्त देवरूख शहरातून जनजागृती रॅली काढली.

# देवरुखात एड्स जनजागृतीसाठी रॅली

सकाळ वृत्तसेवा

साडवली, ता. ३ : जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृतीसाठी देवरूख ग्रामीण रुग्णालय, आयटीसीटी विभाग व देवरूख लायन्स क्लबतर्फे देवरूख शहरात जनजागृती रॅली काढली.

यावेळी संगमेश्वर तहसीलदार संदीप कदम, पोलिस निरीक्षक शिवाजी पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. माने, श्री. डोंगरे, लायन्स क्लब अध्यक्ष नितीन शेडगे, सामाजिक कार्यकर्ते युयुत्सु आर्ते उपस्थित होते. रॅलीत जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक पथक, रत्नागिरी, ऐच्छिक सल्ला केंद्र व तपासणी केंद्र, देवरूख, रामराजे महाविद्यालय, आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालय, इंदिरा फार्मसी महाविद्यालय, मीनाताई ठाकरे विद्यालय, जेसीआय ग्रुप देवरूख, जायंटस् ग्रुप देवरूख व ताम्हाने आदी संस्था संघटना व पदाधिकारी, विद्यार्थी सहभागी झाले होते. वैशाली पुजारी, विद्या माने यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

शब्दांना सत्याची धार

# प्रहार


■ मंगळवार, १६ ऑक्टोबर २०१८ ■ रत्नागिरी

## साडवली येथे रक्तगट तपासणी शिबीर उत्साहात

▶ देवरुख (प्रतिनिधी)

संगमेश्वर तालुक्यातील साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मोफत रक्तगट तपासणी शिबीर घेण्यात आले.

हे शिबीर नुकतेच जि. प. पूर्ण प्राथमिक शाळा ओझरे खुर्द येथे पार पडले. मुख्याध्यापिका सौ. मोघे, श्री. साळवी, श्री. सावंत, प्रा. एस. आय. मेडली, जे. व्ही. नरोटे, प्रा. व्ही. ए. संसारे यांनी रक्तगट तपासणीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाला शालेय विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ७० हून अधिक विद्यार्थी व शिक्षकांचे रक्तगट तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सप्तर्षी कुमटेकर याने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्ही. डी. जाधव, एस. आर. खामकर, एस. ए. इंदुलकर व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी मेहनत घेतली.



रक्तगट तपासणी शिबीरातील एक क्षण

# तरुण भारत

रत्नागिरी

www.tarunbharat.com

बुधवार दि. १७ ऑक्टोबर २०१८


## साडवली फार्मसी महाविद्यालयात मतदान अधिकाराबाबत मार्गदर्शन

**देवरुख:** साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत तहसीलदार संदीप कदम यांनी महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार यादीत नावनोंदणी व मतदान अधिकार याबाबत विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला लिपीक पांड्ये व आशा सेविका साठे, इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. एस. के. नगरे व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी जे. व्ही. नरोटे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. ४० हून अधिक विद्यार्थ्यांनी मतदान यादीत नोंदणी केली.


# सकाळ

रत्नागिरी, मंगळवार, २३ ऑक्टोबर २०१८


## इंदिरा इन्स्टिट्यूटमध्ये मतदार नोंदणी

**देवरुख :** साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत तहसीलदार संदीप कदम यांनी महाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मतदार यादीत नावनोंदणी व मतदान अधिकार याबाबत विशेष मार्गदर्शन केले. लोकशाही सुदृढ होण्यासाठी जास्तीत जास्त युवापिढीने मतदान केले पाहिजे, त्यासाठी १०० टक्के युवा पिढीच्या मतदारांची नोंदणी झाली पाहिजे. याकडे सर्वांनी कटाक्षाने लक्ष द्यावे. तळहातावरील रेषापेक्षा मतदान केल्यावर बोटावर लावण्यात येणारी शाई भावी काळात लोकशाहीसाठी महत्त्वाची असेल असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

■ बुधवार, १७ ऑक्टोबर २०१८ ■ रत्नागिरी

## साडवलीतील फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून मार्लेश्वर देवस्थान परिसराची साफसफाई

▸ देवरुख *(प्रतिनिधी)*

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी दिनाचे औचित्य साधून नजीकच्या साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या एन. एस. एस. विभागाच्या विद्यार्थ्यांनी श्री क्षेत्र मार्लेश्वर देवस्थान परिसराची साफसफाई करत स्वच्छता अभियान राबवले.

विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी, समाजसेवेचे व्रत, समाजसेवा करण्याची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने स्वच्छता अभियान मार्लेश्वर तीर्थक्षेत्री राबविण्यात आले. ग्रामीण व शहरी भागातील लोकांचे जीवन, राहाणीमान त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आदी सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम एन. एस. एस करते.

मार्लेश्वर येथे राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानात फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. सी. हतपक्की, प्रा. ए. बी. खाडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. वाय. मेडली, प्रा. व्ही. ए. संसारे, प्रा. पी. पी. माने, महाविद्यालयाचे शिपाई तसेच एन. एस. एस चे स्वयंसेवक सहभागी झाले होते. स्वच्छता अभियान राबवत स्वच्छता हीच सेवा असा संदेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिला. या स्तुत्य उपक्रमाचे ट्रस्टचे पदाधिकारी व भाविकांनी समाधान व्यक्त केले आहे.



मार्लेश्वर येथील स्वच्छता अभियानात सहभागी झालेले इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक विद्यार्थी आदी

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

■ शनिवार, १३ ऑक्टोबर २०१८ ■ रत्नागिरी

## साडवली येथे जागतिक फार्मासिस्ट डे निमित्ताने रॅली

▸ देवरुख *(प्रतिनिधी)*

संगमेश्वर तालुक्यातील साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत जागतिक फार्मासिस्ट डे निमित्ताने रॅली काढण्यात आली.

या रॅलीचे उद्घाटन संस्थाध्यक्ष रवींद्र माने यांच्या हस्ते करण्यात आले. फार्मसी महाविद्यालय-सावरकर चौक-पोस्ट ऑफीस मार्गे शिवाजी चौक अशी रॅली काढण्यात आली. २०० हून अधिक विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले होते. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी फार्मसीबाबत जागृती केली.

विद्यार्थ्यांबरोबरच प्राचार्य डॉ. बी. सी. हतपक्की, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. आर. मेडली, प्रा. व्ही.



देवरूख परिसरातून काढण्यात आलेली रॅली

ए. संसारे सहभागी झाले होते. रॅलीच्या यशस्वीतेसाठी प्रा. एम. ए. खाडे, प्रा. एस. के. नगरे, प्रा. पी. पी. माने, प्रा. पी. बी. गुरव, प्रा. ए. एम. कनावजे, जे. आय. नरोटे, विद्यार्थी प्रतिनिधी जिगर भानुशाली, सप्तर्षी कुमटेकर यांनी मेहनत घेतली. शिक्षक, कर्मचारी व पोलीस यंत्रणेचेही सहकार्य लाभले.

सोमवार, २८ ऑगस्ट २०१७ www.prahaar.in

# प्रहार

क्रमांक : एमएएचएमएआर/२००८/३५१८० ■ रत्नागिरी शब्दांना सत्याची धार ■ वर्ष ११ ■ अंक २८६ ■ पाने १२

# साडवलीत रवींद्र मानेंच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

देवरुख (*प्रतिनिधी*)

संगमेश्वर तालुक्यातील साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीमध्ये संस्थाध्यक्ष व माजी राज्यमंत्री रवींद्र माने यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबीर घेण्यात आले. याला रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

फार्मसीचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व डेरवण येथील श्री स्वामी समर्थ ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन श्री. माने यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्था कार्याध्यक्षा नेहा माने, सचिव दिलीप जाधव, संजय घाग, मुख्याध्यापक बी. व्ही. नलावडे, प्राचार्य डॉ. बी. सी. हतपक्की यांसह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

शिबिरामध्ये ४० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.



रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना रवींद्र माने सोबत अन्य मान्यवर.

सोमवार, १४ ऑगस्ट २०१७ www.prahaar.in

# प्रहार

एमएआर/२००८/३५१८० ■ रत्नागिरी शब्दांना सत्याची धार ■ वर्ष ११ ■ अंक २७५

## साडवली येथे १६ रोजी रक्तदान शिबीर

▶ देवरुख (वार्ताहर)

संगमेश्वर तालुक्यातील साडवली येथील इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी महाविद्यालयात १६ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

माजी राज्यमंत्री व संस्थाध्यक्ष रवींद्र माने यांच्या वाढदिवसानिमित्ताने हे शिबीर १६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत इंदिरा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी व श्री स्वामी समर्थ ब्लड बँक डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येणार आहे. शिबिरात भाग घेणाऱ्या व्यक्तीस प्रमाणपत्र व भविष्यात निकडीच्या काळात लागणारी रक्ताची गरज भागविण्यासाठीचे प्रमाणपत्र मिळणार आहे.

रक्तदान शिबिरात ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. सी. हतपक्की यांनी केले आहे.